मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दि. 11 डिसेंबर 2025 | पान- 1

# सामर्थ्य आणि सेवेचा संगम: प्रभाग क्र. १ च्या कायापालटासाठी रूपालीताई साने सज्ज

## विकसनशील प्रभाग : ०१

**पिंपरी | प्रतिनीधी :** माहेरी असलेली राजकीय पार्श्वभूमी आणि तीन वेळा नगरसेवक राहिलेल्या महापौरांचा वारसा, यामुळे रूपाली पांडाभाऊ साने यांना लहानपणापासूनच राजकीय वातावरणाचा अनुभव मिळाला. सासरी आल्यावर त्यांना घरातून सामाजिक कार्यासाठी मोठा पाठिंबा मिळाला. माहेरचा वारसा आणि सासरचा सक्रिय पाठिंबा यांच्यामुळेच त्यांना स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याचे संपूर्ण बळ मिळाले. यातूनच त्यांनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेत नवदुर्गा सखी मंचची सुरुवात केली.












महिला सक्षमीकरण, सबलीकरण आणि त्यांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या कार्यात रूपालीताईंनी स्वतःला झोकून दिले आहे. आज नवदुर्गा सखी मंचच्या माध्यमातून १ हजाराहून महिला जोडल्या गेल्या आहेत. विशेष म्हणजे, केवळ महिलांच्या कलागुणांना वाव देणे इतकेच नव्हे, तर महिलांना भेडसावणाऱ्या प्रत्येक समस्येवर त्या जातीने लक्ष घालतात. याचमुळे, अगदी खाजगी प्रश्नही महिला त्यांच्यासमोर हक्काने मांडतात, कारण त्यांना याच ठिकाणी उत्तर मिळेल, हा प्रचंड विश्वास महिलांमध्ये निर्माण झाला आहे. महिलांच्या दैनंदिन जीवनातील धकाधकीतून त्यांना स्वतःसाठी वेळ मिळावा म्हणून रूपालीताईंच्या नेतृत्वाखाली हळदी कुंकू कार्यक्रम सोसायटीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आयोजित केला जातो, ज्याला महिलांचा कायमच उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो.

सामाजिक बांधिलकी जपत, वृद्धांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण यावेत यासाठी ताई त्यांचा जन्मदिवस साजरा करतात. तसेच, त्यांच्यासाठी आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी यांसारख्या आवश्यक आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते. याव्यतिरिक्त, दिव्यांग मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थांना भेट देऊन त्या मुलांना आकर्षक वस्तू आणि खाऊचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवतात.

या प्रभागात पाण्याचा प्रश्न गंभीर असल्याने, साने परिवार कायमच स्वखर्चाने टँकर पुरवण्याचे काम करतात. यासाठी त्यांची स्वतंत्र यंत्रणा कार्यरत आहे. एकदा एका सोसायटीमधून पाणी नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली असल्याचा फोन रूपाली ताईंना आला, पण त्यावेळी चालकाची सोय होत नव्हती. तेव्हा मागचा पुढचा कसलाही विचार न करता आणि वेळ न घालवता रूपालीताईंनी स्वतः टँकर चालवत पाण्याची गरज भागवण्याचं पुण्याचं काम केलं. हे करताना त्यांना कोणताही कमीपणा वाटला नाही, उलट त्यातून त्यांना आनंद मिळाला, असे ताई अतिशय विनम्रपणे सांगतात. रूपालीताईंच्या धडाडीच्या कार्याला सलाम करावासा वाटतो.

आज प्रभागाविषयी बोलताना ताईंची तळमळ स्पष्टपणे जाणवते. पाणी, रस्ते, वीज, सांडपाणी व्यवस्थापन आणि आरोग्याचा प्रश्न यावर बोलताना त्या ठामपणे सांगतात की, केवळ वरकरणी उपाययोजना करून उपयोग नाही. मूळ नियोजन जिथे चुकले आहे, त्यावर काम करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, दरवेळी तुंबलेली गटारे आणि चेंबर्स साफ करण्यापेक्षा, याचे नियोजन कुठे चुकले आहे ते शोधून काढून मूळ प्रश्न मार्गी लावणे हे आपले ध्येय असेल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक एकचा कायापालट करण्यासाठी रूपालीताई पांडाभाऊ साने याच ध्येयाने सज्ज आहेत.

केलेल्या कामावर त्यांना उमेदवार म्हणून संधी मिळेल आणि त्या संधीचे त्या सोनं करतील, असा मोठा आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यातून दिसतो. तसेच, ज्या महिला भगिनी राजकारणात इच्छुक आहेत, त्यांनी स्वतःचे कर्तुत्व आजमावून पाहावे, असे त्या आवर्जून सांगतात. स्वतः नामधारी राहून पती कारभार बघणार हे योग्य नाही; तुम्ही स्वतः सक्षम असायला हवे, तरच महिलांवरचा विश्वास वाढेल आणि निर्णय क्षमता वाढेल, हा महत्त्वाचा संदेशही त्या देतात.

